॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

**बातमी क्र. ०१**

जळगाव दि. २६ ( प्रतिनिधी) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा सव्वीसावा दीक्षांत समारंभ उद्या मंगळवार, दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी होत असून या समारंभासाठी अमेरिकेत स्थायिक झालेले अनिवासी भारतीय सुप्रसिध्द वैज्ञानिक व उद्योजक डॉ.अशोक जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात हा समारंभ होत असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहणार आहेत. या पदवीप्रदान समारंभात ३५ हजार १६४ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात येणार आहेत. यामध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे ११ हजार ९२५ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ३ हजार ३२५ स्नातक, मानव्य विद्याशाखेचे ५ हजार २४२ आणि आंतर विद्याशाखेचे ६६३ स्नातकांचा समावेश आहे. गुणवत्ता यादीतील ८४ विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या समारंभात प्रत्यक्ष पदवी घेण्यासाठी २१ हजार १५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये २२२ पीएच.डी.धारक विद्यार्थी आहेत.

---

**बातमी क्र. ०२**

जळगाव दि. २६ (        ) कै.वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त उदया मंगळवार, दि.२७ फेब्रुवारी रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने कै.भैय्यासाहेब गंधे सभागृहात `वाणी अमृताची ` या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता ला.ना.हायस्कूलच्या गंधे सभागृहात `वाणी अमृताची` हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन हे लक्ष्मीकांत धोंड यांचे असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द अभिनेता सिध्दार्थ चांदेकर आणि अभिनेत्री अश्विनी कासार करणार आहेत. सारेगम फेम मुग्धा वैशंपायन तसेच पं.विश्वनाथ दाशरथे, हेमंत पेंडसे, श्रध्दा जोशी, जान्हवी पवार, श्रेया मोहन, शंतनू रोडे, मैथिली पांडे, अभिषेक देशपांडे, अधिश पायगुडे, श्रीकांत उमरीकर, मैथिली हळदेकर, निलेश चव्हाण हे कलावंत सहभागी होणार असून आद्य मराठी कविता, नाटयपद, नृत्य, कथा आणि लेखांचे नाटयरुप, स्वगत, समुहगीत आणि अहिराणी बोलीभाषा गीत यांचे सादरीकरण केले जाणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते होणार असून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.केशव तूपे यांची उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी खुला असून उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील आणि वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड यांनी केले आहे.

**बातमी क्र. ०३**

जळगाव दि.२६ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाच्या वतीने उदया मंगळवार दि.२७ फेब्रुवारी पासून ` भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेपुढील नवीन आव्हाने ` या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून भारतातील संरक्षण तज्ज्ञ व सेवानिवृत्त मेजर जनरल डॉ.जी.डी.बक्षी हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसाच्या राष्ट्रीय चर्चासत्रात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षे समोरील आव्हाने तसेच भारताचे जागतिक राजकारणात वाढणारे महत्त्व, परराष्ट्र धोरण, अंतर्गत सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, सीमा सुरक्षा, सागरी सुरक्षा, अवकाश तंत्रज्ञान, काश्मीरमध्ये वाढणाऱ्या दहशतवादी कारवाया, भारत-चीन सीमा प्रश्न आणि भारताच्या उत्तर पूर्वोत्तर राज्यातील सुरक्षे संदर्भातील प्रश्न आणि महत्त्व या विषयावर देशभरातील नामवंत सुरक्षा तज्ञ आपले विचार मांडणार आहेत. डॉ.बक्षी यांच्या हस्ते २७ फेब्रवारी रोजी सकाळी १० वाजता उद्‌घाटन होणार असून अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर राहतील. विशेष अतिथी म्हणून पोलिस अधिक्षक दत्तात्रय कराळे उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसाच्या या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रामुख्याने डॉ.जी.डी.बक्षी यांच्यासह डॉ.श्रीकांत परांजपे पुणे, ब्रिगेडीयर हेमंत महाजन पुणे, ग्रृप कॅप्टन अजय लेले दिल्ली, डॉ.अमित मुखर्जी बंगलोर, डॉ.ए.एस.दळवी पुणे, डॉ.जावेद खान, नाशिक, डॉ.लियाकत खान मुंबई, डॉ.प्रियरंजन घोष नाशिक, डॉ.मनोज साळी नाशिक तसेच डॉ.मुंकुंद नार्विकर गोवा आदी हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात वेगवेगळ्या विषयांवर दोन दिवसासाठी मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २६ फेब्रुवारी, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी